निर्वाह भत्त्याचे पुर्नविलोकन करणे बाबत
श्री.मते संजय महादु सेवा निलंबीत
ग्रामसेवक ग्रामपंचायत पुणेवाडी/ ता.पारनेर

जिल्हा परिषद, अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग-२
आदेश क्र. साप्रवि-२/ग्राप-३/ ४४१९६९ /२०२४
दिनांक-२७ /०६ /२०२४

संदर्भ :- १) या कार्यालयाकडील सेवा निलंबन आदेश क्र. साप्रवि-२/ग्राप-३/७१४/२०२३ दिनांक- ०१/११/२०२२

२) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय डी.एस.आर/सी.आर/एसईआर-८ दिनांक- १० डिसेंबर १९८१

३) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदान ) नियम १९८१ चा नियम ६८ (१)

संदर्भ क्रमांक १ चे आदेशान्वे श्री.संजय महादु मते ग्रामसेवक ग्रामपंचायत पुणेवाडी/ हत्तलखिंडी यांनी पंचायत समिती पारनेर येथे कार्यरत असतांना कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा व कर्तव्यात कसुर करण्याचे गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केल्याचे भंग केल्यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम क्र.३ (१) अ मध्ये दिलेल्या तरतूदीस अधिन राहून परिषद सेवेतुन सेवा निलंबीत करण्यात आले आहे.

संदर्भ क्र.२ चे शासन निर्णयात जे शासकीय कर्मचारी तीन किंवा अधिक महिने निलंबित असतील त्यांचे बाबतीत तीन महिने पूर्ण होताच निर्वाह भत्याचे दराचे पुनर्विलोकन करण्यात यावे असे नमुद आहे. श्री.संजय महादु मते यांना दिनांक ०१/११/२०२२ पासुन सेवा निलंबीत करणेत आलेले आहे.सबब त्यांचा सेवानिलंबनाचा कालावधी हा तीन महिने पुर्ण झालेला आहे.

श्री.संजय महादु मते हे त्यांचा सेवा निलंबन कालावधी वाढविणेस ते जबाबदार नसलेचे निष्पन्न झाले आहे. सबब मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदान ) नियम १९८१ चा नियम ६८ (१) च्या तरतुदीस अधिन राहून मला प्रदान केलेल्या अधिकारचा वापर करुन श्री.संजय महादु मते यांचे सेवा निलंबीत केल्यानंतर पहिल्या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये देण्यात आलेला निर्वाह भत्त्याच्या ५० टक्के वाढ इतक्या मर्यादेपर्यंत तीन महिन्याचे कालावधीनंतर सदर कर्मचारी जि.प.सेवेत हजर होईपर्यत

वाढविण्यास मंजूरी देत आहे. तसेच संदर्भ क्र.१ चे आदेशामधील अटी व शर्तीचे काटेकोर पालन करणे श्री.संजय महादु मते यांना बंधनकारक राहील.

या आदेशाची नोंद श्री.संजय महादु मते यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी व तसा अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक 202406270600 84 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 27-06-2024 17:15:23
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,

श्री.संजय महादु मते सेवा निलंबित सेवानिलंबीत ग्रामसेवक पंचायत समिती पारनेर सध्या मुख्यालय पंचायत समिती जामखेड

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड

२/- सोबतचा आदेश संबंधितास बजावून तो मिळाले बाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घ्यावी व सदर प्रत इकडेस सादर करावी.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारनेर

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर

प्रत :- निवड नस्ती

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर